शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

जा.क्र.:-शांतनिमि/विवि/उ.प.२०२१/७९७ दिनांक:- 11 APR 2022

**महत्वाचे परिपत्रक :-**

**विषय -उन्हाळी परीक्षा २०२२ च्या आयोजना बाबत..**

संदर्भ- १) मा. सचिव, म. रा. तं. शि. म. मुंबई यांचे कार्यालयाचे महत्वाचे परिपत्रक क्र.मरातंशिम/का-४०/(परीक्षा विभाग)/F१/२०२२/०५३ दिनांक - ०४/०४/२०२२

सर्व विभाग प्रमुखांना/ आधिकारी /प्र.आधिकारी/कर्मचारी /विद्यार्थी व त्यांच्या पालकांना सुचित करण्यात येते की, सर्व विद्यार्थ्यांची सर्व विषयांची **उन्हाळी परीक्षा २०२२** परीक्षेचे आयोजन करणे तसेच परिक्षा सुरळीत पार पाडणे करीता मा.सचिव महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांनी परीक्षेची रुपरेषा व कार्यपध्दती खालील प्रमाणे या टळक वावी उपरोक्त संदर्भिय परिपत्रका नूसार कळवण्यात आल्याआहेत.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील सर्व सत्रातील विद्यार्थ्यांची उन्हाळी परीक्षा -२०२२ पासून प्रात्यक्षिक परीक्षा व लेखी परीक्षा मंडळाच्या प्रचलित पध्दतीने लागू झालेल्या Teaching Examination Scheme, मंडळाच्या परीक्षा विषयक निमावली तरतूद व Manual for conduct of Examination, Assessment pricess & Post Result Activities मधील मार्गदर्शक तत्वानुसार घेण्यात येणार आहेत.

२. विद्यार्थी हितास्तव केवळ उन्हाळी -२०२२ परिक्षे करीता Teachiing Examination Scheme नुसार निर्धारीत केलेल्या फक्त लेखी परीक्षेच्या कालावधीत प्रत्येक तासाच्या कालावधीकरीता अतिरीक्त १० मिनीटे वेळ देण्यात येईल. उदा. Teching Emamination Scheme नुसार लेखी परीक्षेसाठी ३ तासांचा कालावधी निर्धारीत केला असेल अशा लेखी परीक्षेस ३०मिनीटे अतिरीक्त वेळ देण्यात येईल.

३. मंडळाने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील सत्राकरीता शैक्षणिक वेळापत्रक दि.२१.०१.२०२२ रोजी जाहीर केले होते. त्या नुसार व्दितीय घटक चाचणी परीक्षा दिनांक २७.५.२०२२ रोजी संपणार आहे. त्या अनुषंगाने उन्हाळी परीक्षा २०२२ प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेचे वेळा पत्रक खालील प्रमाण घोषीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | परीक्षा | कालावधी |
|---|---|---|
| १ | प्रात्यक्षीक परीक्षा | २८ मे ते ६ जून २०२२ |
| २ | लेखी परीक्षा | ०८जून ते २८ जून २०२२ |

४. कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेली अपवादात्मक परीस्थीतीत प्रात्यक्षिक व Multiple Choice Qustion (MQC) नुसार ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेच्या आयोजना करीता मंडळाने निर्गमित केलेले परिपत्रक अथवा आदेश हे उन्हाळी परीक्षा २०२२ पासून लागु रहाणार नाहीत.

(पुढील पानावर.)

(मागील पानावरून )

सदर परीक्षेकरीता तसेच पुढील परीक्षेकरीता Examination Regulations (२०१८ - १९) मधील सर्व तरतूदी तसेच Manual for Conduct of Examination, Assessment Process & Post Result Activities नुसार देण्यात आलेली मार्गदर्शक तत्वे लागू रहातील.

विभाग प्रमुखानी या बाबत आपल्या विभागातील विद्यार्थी, पालक, अध्यापक व इतर कर्मचाऱ्यांना अवगत करावे. परीक्षेसंदर्भास अनुसरुन असणाऱ्या बाबी सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून देवून विद्यार्थी व पालकांच्या शंकाचे निरसन व मार्गदर्शन करावे. तसेच उपरोक्त संदर्भीय बाबींनुसार परीक्षा सुरळीतपणे विहीत कालावधीत पार पडेल याची दक्षता घेवून आवश्यक ती कार्यवाही करावी. सदर परीक्षा विहीत कालावधीत सुरळीत पार पाडण्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत विभाग प्रमुखांची असेल याची नोंद घ्यावी.

(कॅप्टन डॉ. नि.पां.सोनजे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,मिरज.

सोबत- संदर्भिय परिपत्रक.

प्रतिः- सर्व विभाग प्रमुख/प्र.विभागप्रमुख/प्र.आधिकारी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

२/-सदरचे परिपत्रक आपले विभागातील आधिकारी, कर्मचाऱ्यांच्या व सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावे .

| | | | |
|---|---|---|---|
| १)स्थापत्य विभाग | २) यंत्र विभाग | ३) संगणक विभाग | ४) मेडि. ईलेक्टॉनिक्स विभाग |
| ५)प्लास्टीक(पॉलिमर)विभाग | ६)उपयोजित यंत्रशास्त्र | ७)कर्मशाळाविभाग | ८)विज्ञान व मानव्यशास्त्र विभाग |
| ९) विद्युत विभाग. | १०)ग्रंथालय विभाग | | |

प्रतः- १.श्री. काळे एस.पी. प्रोग्रॅमर यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे करीता.
२.विद्यार्थी सुचना फलक.